भूसंपादन प्रकरणांमध्ये मा. न्यायालयाच्या (Reference Court) निवाड्यानुसार वाढीव मोबदल्याच्या रक्कमेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल विभाग
शासन परिपत्रक क्र: न्यायप्र-२०२६/प्र.क्र.३२०/भूसंपादन-०२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दि. ०३.११.२०२६.

<u>वाचा</u> :-**१.** मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील प्रथम अपील क्र.१९३३/२०२५, दि.२२.०९.२०२६ रोजी पारीत केलेले आदेश.
२. शासन परिपत्रक क्र: न्यायप्र-२०२६/प्र.क्र.३२०/भूसंपादन-०२, दि.२१.१०.२०२६.

<u>प्रस्तावना :-</u>

भूसंपादन अधिनियम, १८९४ अन्वये सार्वजनिक प्रयोजनांसाठी विशेषत: पायाभूत सुविधा व सिंचन व इतर प्रकल्पांसाठी संपादीत करण्यात आलेल्या जमिनीच्या उपरोक्त वाचा येथील वाढीव मोबदला प्रकरणांमध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.२२.०९.२०२६ अन्वये मा. न्यायालयाच्या निकालानंतर करावयाच्या कार्यवाहीसाठी टप्पे निश्चित करणे तसेच प्रत्येक टप्प्यासाठी निश्चित कालमर्यादा व जबाबदारी निश्चित करणे आणि नियंत्रण ठेवणे यासाठी सूचना निर्गमित करण्याचे निर्देश दिले आहेत. उक्त निर्देशानुसार शासन स्तरावरून सर्व समावेशक सुचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार उपरोक्त वाचा येथील क्र.२ येथे नमूद केलेले शासन परिपत्रक अधिक्रमित करुन नव्याने खालीलप्रमाणे सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

शासन परिपत्रक :-

मा. न्यायालयाचे निर्देश विचारात घेता, भूसंपादन अधिनियम, १८९४ मधील तरतूदी विचारात घेऊन मा. न्यायालयाने वाढीव मोबदल्याबाबत दिलेल्या आदेशाबाबत करावयाच्या कार्यवाहीसाठी भूसंपादन अधिकारी व भूसंपादन संस्था यांनी अवलंबिण्याची कार्यपद्धती व कालमर्यादा परिपत्रकासोबतच्या "परिशिष्ट अ" व "परिशिष्ट ब" मध्ये विहित करण्यात येत आहेत. सदर परिशिष्टामधील सुचना व कालमर्यादा काटेकोरपणे अवलंबिण्यात येईल याबाबत दक्षता घेण्यात यावी.

०२. मा. न्यायालयाने पारीत केलेल्या वाढीव मोबदल्याबाबतच्या आदेशाविरुद्ध अपील करण्यात यावे किंवा कसे याबाबत जास्तीत जास्त ६० दिवसांत निर्णय घ्यावा. असा निर्णय घेण्यास सबळ कारणांशिवाय विलंब झाल्यास संबंधितांवर महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम १० नुसार कारवाई करण्यात येईल.

०३. अपीलाबाबत निर्णय झाल्यास संबंधित अधिकाऱ्याने अपिल प्रस्ताव सादर करताना सोबतच्या परिशिष्ट "अ" अथवा परिशिष्ट "ब" नुसार लागू कालमर्यादा नस्तीवर ठळकपणे नोंदवावीत. तसेच

न्यायालयीन निर्णयाचा दिनांक, प्रमाणित प्रतीसाठी अर्ज केल्याचा दिनांक, निर्णयाची प्रत प्राप्त झाल्याचा दिनांक आणि शासकीय अभियोक्ता / पॅनेल ॲडव्होकेट यांना संपूर्ण कागदपत्रे दिल्याचा दिनांक इत्यादी बाबी नोंदविण्यात याव्यात.

०४. मा. न्यायालयीन निर्णयाची प्रत ऑनलाइन उपलब्ध असल्यास अशा प्रकरणांवर तातडीने कार्यवाही करण्यात यावी. केवळ प्रमाणित प्रत उपलब्ध नाही या कारणास्तव संबंधित अधिकाऱ्यांनी अशी प्रकरणे प्रलंबित ठेवू नयेत.

०५. मा.न्यायालयाकडील वाढीव मोबदला प्रकरणांबाबत प्रकरण क्रमांक, निकालाचा दिनांक, वाढीव मोबदला रक्कम, कालमर्यादा, अपील प्रस्ताव प्राप्त झाल्याचा दिनांक, जबाबदार अधिकारी, प्रत्येक टप्प्यावर केलेली/करावयाची कार्यवाही, प्रत्यक्ष अपील दाखल केल्याचा दिनांक इत्यादी बाबत स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात यावी.

०६. मा. न्यायालयीन निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाही करताना कोणत्याही टप्प्यावर विहित मुदतीपलीकडे विलंब झाल्यास संबंधित अधिकाऱ्याने लेखी कारणे नमूद करुन याबाबतचा विलंब संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणावा. अशी विलंबाबाबतच्या प्रकरणी ६० दिवसांची अंतिम मुदत ओलांडल्यानंतर, अशी प्रकरणे जिल्हाधिकारी/विभागीय आयुक्त यांनी स्वतंत्र आढावा घेऊन आवश्यकतेनुसार जबाबदारी निश्चित करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०२६११०३११४४४५२४४८** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MITHUN SITARAM METKARI

Digitally signed by MITHUN SITARAM METKARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department, 2.5.4.20=C5E8236705FDBCCA44E2729131D7F8ECF3D89986EF302C333A751DB3D8202DE1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F9CC4741E617C7D288990243652309A7CD19A13FD383DEF17B5669F6F383A116, cn=MITHUN SITARAM METKARI
Date: 2026.11.03 11:48:38 +05'30'

(मिथुन मेटकरी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, लोकभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे अ.मु.स., मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई
३) मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई
४) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व अल्पसंख्यांक) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई
८) अपर मुख्य सचिव (महसूल, नोंदणी व मुद्रांक), मंत्रालय, मंबई.
९) मा. अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

१०) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
११) मा. अपर मुख्य सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहायक, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) मा. अपर मुख्य सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) सह सचिव (भूसंपादन) यांचे स्वीय सहायक, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई
१५) सर्व विभागीय आयुक्त
१६) सर्व जिल्हाधिकारी
१७) सर्व उपायुक्त भूसंपादन (कोकण,पुणे,नाशिक,छत्रपती संभाजीनगर,नागपूर,अमरावती)
१८)प्रादेशिक अधिकारी, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, मुंबई व नागपूर
१९) मुख्य अभियंता, मुंबई रेल्वे विकास प्राधिकरण, मुंबई
२०) मुख्य अभियंता, मध्य रेल्वे व पश्चिम रेल्वे मुंबई
२१) संचालक, नगर रचना, पुणे.
२२) सर्व अधिक्षक अभियंता, (सार्वजनिक बांधकाम / जलसंपदा)
२३) उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई
२४) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई
२५) व्यवस्थापकीय संचालक, शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई
२६) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ, मुंबई
२७) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई
२८)मा. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई
२९) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे
३०) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर
३१) महाराष्ट्र विमानतळ विकास कॉर्पोरेशन लि. मुंबई
३२) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई
३३) महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, मुंबई
३४) मुख्य अभियंता, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे
३५) मुख्य अभियंता, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर
३६) महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी मर्यादित, मुंबई
३७) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई
३८)हिंदुस्तान ऑर्गेनिक केमिकल्स लिमिटेड, मुंबई
३९) महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, मुंबई
४०) निवडनस्ती (भूसंपादन-२)

परिशिष्ट – अ

राज्य शासन वा राज्य शासनाचा प्रशासकीय विभाग भूसंपादन संस्था असल्यास करावयाची कार्यवाही :

अ.क्र.	कार्यवाही	जबाबदार अधिकारी	कमाल कालमर्यादा
१	न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत उपलब्ध करुन घेणे.	जिल्हाधिकारी / विशेष भूसंपादन अधिकारी	न्यायालयीन निर्णयाच्या दिनांकापासून ७ दिवस
२	न्यायालयीन निर्णयाची ऑनलाइन अथवा कार्यालयीन प्रत विचारात घेऊन संबंधित विभागाकडे अपीलाचा प्रस्ताव दाखल करणे.	जिल्हाधिकारी / विशेष भूसंपादन अधिकारी	
३	अपील प्रस्ताव तयार करण्यासोबतच वाढीव मोबदला रकमेची परिगणना व खातरजमा करणे.	जिल्हाधिकारी / विशेष भूसंपादन अधिकारी	न्यायालयीन निर्णयाच्या दिनांकापासून १५ दिवस
४	अपीलाबाबत जिल्हा सरकारी वकिलांचे अभिप्राय घेणे.	जिल्हाधिकारी / विशेष भूसंपादन अधिकारी	
५	परीपूर्ण प्रस्ताव (निकाल, संपादन कागदपत्रे, गणना, कायदेशीर अभिप्राय मिळाले असल्यास) मंत्रालयातील संबंधित मूळ विभागाकडे पाठविणे.	जिल्हाधिकारी / विशेष भूसंपादन अधिकारी	उपरोक्त कायर्वाही पूर्ण झाल्यापासून ७ दिवस
६	अपील करणे/न करणे याबाबत अंतिम निर्णय घेणे.	राज्य शासनाचा संबंधित मंत्रालयीन विभाग	प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून १५ दिवस
७	अपील करण्याचा निर्णय झाल्यास संपूर्ण प्रस्ताव व कागदपत्रे विधि व न्याय विभागाकडे पाठविणे.	राज्य शासनाचा संबंधित मंत्रालयीन विभाग	अपील करण्याबाबत निर्णय झाल्यापासून ७ दिवस
८	छाननी करून अपील दाखल करण्याच्या मंजुरीबाबत निर्णय घेणे.	विधि व न्याय विभाग	प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून १५ दिवस
९	मंजुरी व संपूर्ण कागदपत्रे शासकीय अभियोक्ता कार्यालय, मा. उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई यांना पाठविणे.	राज्य शासनाचा संबंधित मंत्रालयीन विभाग	अपिलाबाबतच्या प्रस्तावास मंजूरी मिळाल्यापासून ३ दिवस

अ.क्र.	कार्यवाही	जबाबदार अधिकारी	कमाल कालमर्यादा
१०	कोर्ट फी व दाखल खर्चाची व्यवस्था करणे. (सोबतच)	जिल्हाधिकारी / विशेष भूसंपादन अधिकारी व संबंधित प्रशासकीय विभाग विभाग	उक्त कार्यवाही क्र. ५ ते ९ सोबत करणे.
११	कागदपत्रे व मंजुरी मिळताच अपील तयार करून दाखल करणे.	शासकीय अभियोक्ता कार्यालय	कागदपत्रे व मंजुरी प्राप्त झाल्यापासून ३ दिवस
१२	अपील न करण्याचा निर्णय झाल्यास नुकसानभरपाई देण्याची प्रक्रिया सुरू करणे.	जिल्हाधिकारी / विशेष भूसंपादन अधिकारी	अपील न करण्याच्या निर्णयापासून १५ दिवस
१३	मागणीवर कार्यवाही करून रक्कम मंजूर/वितरित करणे.	राज्य शासनाचा संबंधित मंत्रालयीन विभाग	आर्थिक उपलब्धता व कार्यपद्धतीनुसार

१. उक्त नमूद कार्यवाही क्र. १ ते ४ एकाच वेळी (simultaneously) करण्यात यावी.

२. अपिल दाखल करणे अथवा न करणे याबाबतचा निर्णय, कागदपत्रांची छाननी, मंजुरी आणि संपूर्ण कागदपत्रे शासकीय अभियोक्त्यांकडे पोहोचविणे ही संपूर्ण प्रक्रिया निकालाच्या तारखेपासून ६० दिवसांत पूर्ण करावी.

३. मा. न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध उक्त नमूद कालमर्यादेत अपील प्रत्यक्ष दाखल करण्याची **अंतिम जबाबदारी संयुक्तरित्या जिल्हाधिकारी/ विशेष भूसंपादन अधिकारी आणि शासकीय अभियोक्ता कार्यालय यांची राहील**.

परिशिष्ट - ब

महामंडळ/मंडळ/विकास प्राधिकरण/स्थानिक स्वराज्य संस्था इत्यांदीमार्फत अपील दाखल करताना अनुसरावयाची कार्यपद्धती :-

अ.क्र.	कार्यवाही	जबाबदार प्राधिकारी	कमाल कालमर्यादा
१	न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत उपलब्ध करुन घेणे.	संबंधित भूसंपादन संस्थेचे जबाबदार अधिकारी	न्यायालयीन निर्णयाच्या दिनांकापासून ७ दिवस
२	न्यायालयीन निर्णयाची ऑनलाइन अथवा कार्यालयीन प्रत विचारात घेऊन संबंधित भूसंपादन संस्थेच्या विधी विभागाकडे अपीलाचा प्रस्ताव दाखल करणे.		
३	देय नुकसानभरपाईची गणना तयार करून पडताळणीसाठी संबंधित भूसंपादन अधिकारी यांच्याकडे पाठविणे.	संबंधित भूसंपादन संस्थेचे जबाबदार अधिकारी	निकालाच्या तारखेपासून १५ दिवस
४	संबंधित भूसंपादन संस्थेच्या विधी विभागाने अपील करणे/न करणे याबाबत सबळ लेखी कारणांसह निर्णय घेणे.	संबंधित भूसंपादन संस्थेचा विधी विभाग	प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून १५ दिवस
५	भूसंपादन संस्थेच्या विधी विभागाने अपिल करण्याबाबत निर्णय घेतल्यास संपूर्ण प्रस्ताव सक्षम प्राधिकाऱ्यासमोर ठेवणे.	संबंधित भूसंपादन संस्थेचे जबाबदार अधिकारी	संबंधित भूसंपादन संस्थेच्या विधी विभागाकडून निर्णय प्राप्त झाल्यानंर ७ दिवस
६	संबधित भूसंपादन संस्थेच्या सक्षम प्राधिकाऱ्याने अपिल दाखल करणेबाबत अंतिम निर्णय घेणे	संपादन संस्थेचे सक्षम प्राधिकारी	परीपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून ७ दिवस
७	भूसंपादन संस्थेच्या अपिल निर्णयास प्रशासकीय विभागाची मान्यता आवश्यक असल्यास असा परिपूर्ण प्रस्ताव संबंधित प्रशासकीय विभागास अथवा विधी व न्याय विभागास सादर करणे.	संबंधित भूसंपादन संस्थेचे जबाबदार अधिकारी	उपरोक्त अपील करण्याच्या निर्णयापासून ७ दिवस
८	उक्त मुद्दा क्र. ७ प्रमाणे विभागास प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर संबंधित विभागाने आवश्यकता असल्यास विधी व न्याय विभागास प्रस्ताव सादर करणे.	संबंधित संपादन संस्थेचा प्रशासकीय विभाग	परीपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून ७ दिवस

अ.क्र.	कार्यवाही	जबाबदार प्राधिकारी	कमाल कालमर्यादा
९	विधी व न्याय विभागाने उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर छाननी करून निर्णय कळविणे.	विधि व न्याय विभाग	परीपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून १५ दिवस
१०	भूसंपादन संस्थेने अपिल दाखल करण्यासाठी कोर्ट फी, वकिलाची फी व इतर दाखल खर्चाची रक्कम उपलब्ध करणे.	संबंधित भूसंपादन संस्थेचे जबाबदार अधिकारी	कार्यवाही क्र. ५ ते ९ सोबत
११	परीपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर अपील तयार करून दाखल करणे.	शासकीय अभियोक्ता / पॅनेल ॲडव्होकेट	परीपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून ३ दिवस
१२	संबंधित भूसंपादन संस्थेने अथवा विभागाने मा. न्यायालयाच्या निर्णयाविरोधात अपील न करण्याचा निर्णय घेतल्यास आवश्यकतेनुसार निधी उपलब्धतेबाबतचा प्रस्ताव सक्षम प्राधिकाऱ्याकडे सादर करणे.	संबंधित भूसंपादन संस्थेचे जबाबदार अधिकारी	कायदेशीर मत प्राप्त झाल्यापासून १५ दिवस
१३	संबंधित अधीक्षक अभियंता / सक्षम प्राधिकारी यांना शासनाकडून निधी उपलब्धतेची आवश्यकता असल्यास प्रस्ताव शासनाकडे पाठविणे	संबंधित भूसंपादन संस्थेचे जबाबदार अधिकारी	मागणी प्राप्त झाल्यापासून ३० दिवस
१४	कायदा व आर्थिक कार्यपद्धतीनुसार रक्कम मंजूर करण्याची कार्यवाही	भूसंपादन संस्थेचा प्रशासकीय विभाग	विहीत कार्यपद्धतीनुसार

१. वरील कार्यवाही क्र. १ ते ३ एकाच वेळी करावी.

२. अपिल दाखल करणे अथवा न करणे याबाबतचा निर्णय, कागदपत्रांची छाननी, मंजुरी आणि संपूर्ण कागदपत्रे शासकीय अभियोक्त्यांकडे पोहोचविणे ही संपूर्ण प्रक्रिया निकालाच्या तारखेपासून ६० दिवसांत पूर्ण करावी.

३. मा. न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध उक्त नमूद कालमर्यादेत अपील प्रत्यक्ष दाखल करण्याची अंतिम जबाबदारी संयुक्तरित्या संबंधित भूसंपादन संस्थेचे जबाबदार अधिकारी आणि शासकीय अभियोक्ता कार्यालय यांची राहील.
